# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – ५८

## (सभावृत्तांत)

दिनांक – ११/०४/२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ११/०४/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.अमित राजेंद्र गावडे
५. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
६. मा.आंगोळकर सागर सुनिल
७. मा.लोंढे नम्रता योगेश
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.गीता सुशिल मंचरकर
१०. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
११. मा.लांडगे सारिका संतोष
१२. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१४. मा.बारणे अर्चना तानाजी
१५. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.आष्टीकर-प्र.अतिरिक्त आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, डॉ.साळवे-वैद्यकीय संचालक, मा.पाटील,मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण-सहशहर अभियंता,मा.डोईफोडे,मा.लोणकर,मा.खोराटे-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.गायकवाड-उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पोमण -मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,मा.निकम,मा.सवणे,मा.इंगळे,मा.तांबे,मा.चव्हाण,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.जुंधारे, मा.गलबले,मा.कांबळे,मा.औंभासे, मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.पाटील,मा.घुबे-कार्यकारी

अभियंता,मा.डॉ.दरडे-पशुवैद्यकीय अधिकारी,मा.जगताप-कामगार कल्याण अधिकारी,मा.गिरी-अंतर्गत लेखापरिक्षक (पीएमपीएमएल) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक २०) मा.स्थायी समिती ठराव क्र.२१८१ दि.७/२/२०१८ मध्ये दुरुस्तीबाबत- मा.सागर आंगोळकर, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २१) उन्हाळी हॉकी शिक्षण शिबीर २०१८ आयोजित करणेबाबत- मा.सागर आंगोळकर, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २२) प्र.क्र.११ मधील पूर्णानगर येथील से.क्र.१८ सीडीसी मधील मोकळी जागा क्र.४ पर्यटन केंद्राच्या धर्तीवर विकसीत करणेकरीता वास्तुविशारदाची नेमणूक करणेबाबत-मा.विकास डोळस, मा.प्रज्ञा खानोलकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २३) प्र.क्र.२६ वाकड-पिंपळे निलख मधील विविध डी.पी. रस्त्यांकरीता लिनिअर गार्डन व चौक सुशोभिकरण करणेकरीता सल्लागार नेमणेबाबत-मा.विकास डोळस, मा.प्रज्ञा खानोलकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २४) सल्लागार नेमणूकीबाबत-मा.सारीका लांडगे, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २५) वास्तुविशारद म्हणून नेमणूक करणेबाबत-मा.सारीका लांडगे,मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २६) वास्तुविशारद म्हणून नेमणूक करणेबाबत-मा.यशोदा बोईनवाड, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २७) प्र.क्र.५७ पिंपळे गुरव येथील आ.क्र.३४७ खेळाचे मैदान विकसीत करणेकामी सल्लागार नियुक्ती करणेबाबत-मा.सागर आंगोळकर, मा.अर्चना बारणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २८) घंटागाडी कामगारांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सणाकरिता अग्रीम मिळणेबाबत - मा.यशोदा बोईनवाड, मा.अर्चना बारणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २९) प्र.क्र.१२ मध्ये जनित्र संच,ध्वनीक्षेपण व्यवस्था व प्रकाश व्यवस्था करणेबाबत - मा.साधना मळेकर, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३०) एल.ई.डी, स्पीकर खर्च व मंडप खर्च यांचा अनावश्यक खर्च टाळणेबाबत – मा.विलास मडीगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३१) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२७८ दि.२१/२/२०१८, ठराव क्र.२३८६ दि.२८/२/२०१८ रद्द करणेबाबत-मा.विलास मडीगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२७९ दि.२१/२/२०१८,ठराव क्र.२३८५

दि.२८/२/२०१८ रद्द करणेबाबत-मा.विलास मडीगेरी,मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव...

--------

ठराव क्रमांक -२५२१ विषय क्रमांक - १
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/१९५२/२०१८ दि.३१/०३/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६८/१-२०१७-१८ देहू आळंदी रस्त्यावरील विविध सेवा वाहिन्यांसाठी खोदलेला रस्ता व पदपथ यांचे चर पुर्ववत करणेकामी मे.डी.डी.कन्स्ट्रक्शन नि.र.रु.९३,३७,०६४/- (अक्षरी र.रू. त्र्याण्णव लाख सदोतीस हजार चौसष्ठ फक्त) पेक्षा १७.२७% कमी दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा ३०.५०% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.७७,२४,५५३/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५२२ विषय क्रमांक - २
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विमुका/४/कावि/१४५/२०१८ दि.३१/३/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील निविदा नो.क्र.२३-२०१७/१८ मधील अ.क्र.७ अन्वये मनपा मुख्यालयात उर्वरित सी.सी.टी.व्ही. यंत्रणा उभारणेकामी मे.वैभव इंटरप्रायजेस नि.र.रू.२८,००,७०९/- (अक्षरी र.रू.अठ्ठावीस लाख सातशे नऊ फक्त) पेक्षा ३.३५% कमी या ठेकेदाराकडुन काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीस अधिन राहुन ठेकेदाराबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५२३ विषय क्रमांक - ३
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/७३१/१८ दि.३१/३/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४६/३२/२०१७-१८ अन्वये प्रभाग क्र.१० तुळजाईवस्ती व विवेकनगर मध्ये पेव्हींग ब्लॉक, गटर्स. रस्ते दुभाजक, फुटपाथ व मनपा इमारतीची किरकोळ दुरूस्तीची कामे करणेकामी M/s.D.S.Kulkarni नि.र.रू.४६,२०,४८६/- (अक्षरी र.रू.शेहेचाळीस लाख वीस हजार चारशे शहाऐंशी फक्त) पेक्षा ११.११% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.४१,०७,१५०/- पर्यंत काम करुन घेणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५२४ विषय क्रमांक - ४
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – कार्यशाळा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.काशा/३/कावि/१६०/२०१८ दि.२/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय अंदाज समिती दिनांक २३ ते २४/११/२०१७ कालावधीत पुणे दौ-याकामी जिल्हाधिकारी कार्यालय यांचे आदेशान्वये मे.कारलींक्स ट्रॅव्हल्स, पुणे यांचेकडून वाहनांची व्यवस्था करणेत आली होती. सदर दौ-याकरिता पिंपरी चिंचवड मनपाच्या वाट्यास आलेली र.रू.१,०५,०००/- (अक्षरी र.रू. एक लाख पाच हजार फक्त) मे. कारलींक्स ट्रॅव्हल्स, पुणे यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५२५ विषय क्रमांक - ५
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – माध्यमिक शिक्षण
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक–मा.नम्रता लोंढे
संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/४/कावि/२१२/२०१८ दि.२/४/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मे.श्री भक्ती एंटरप्रायजेस, चिखली प्राधिकरण, पुणे-१९ यांना २६ जानेवारी २०१७ प्रजासत्ताक दिनानिमित्त एकूण ९,३६३ बिस्कीटांचा पुरवठा केलेचे बिल रु.८५,११०/- (अक्षरी र.रू.पंच्याऐंशी हजार एकशे दहा फक्त) त्यांना अदा केले असल्याने सदरच्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे तसेच १५ ऑगस्ट २०१७ स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांना खाऊ म्हणून

बिस्कीटांचे वाटप करणेकामी आगावू घेतलेल्या र.रु.८६,११९/-(अक्षरी र.रू.शहाऐंशी हजार एकशे एकोणीस फक्त)चा हिशोब पुर्ण होत असल्याने त्याचे समायोजन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५२६ विषय क्रमांक - ६

दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – वैद्यकीय मुख्य कार्यालय

सूचक –मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/३/कावि/२९१/२०१८ दि.३/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील प्रस्तावित पदव्युत्तर संस्थेकरीता नेमणुक केलेल्या अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांनी खाजगी व्यवसाय करुन अध्यापनाचे कामकाज करण्याचा विकल्प स्विकारलेला आहे त्यांना पे स्केलनुसार एन.पी.ए.भत्ता वगळून उर्वरित रक्कम मानधन म्हणुन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५२७ विषय क्रमांक - ७

दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/१अ/कावि/३२५/२०१८ दि.३/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाच्या कार्यशाळा विभागातील कार्यकारी अभियंता या पदास कामांची बिल मंजूर करण्याबाबत मा.स्थायी समिती कडील ठराव क्र.१९३८१ दि.२३/१२/२०१६ नुसार दि.१८/०१/२०१७ च्या आदेशान्वये र.रु.२,००,०००/- (अक्षरी र.रू. दोन लाख फक्त) मर्यादा पर्यंत वित्तीय अधिकार प्रदान करणेत आलेले आहे. तथापि कार्यशाळा विभागाकडील वित्तीय कामकाजात सुसूत्रता, सुरळीतपणा व सहजता येणेकामी तसेच कामकाजाचा जलद गतीने निपटारा होणेकरीता सदर पदाची कामाची बिले मंजूर करावयाची वित्तीय अधिकार मर्यादा र.रु.१०,००,०००/- (अक्षरी र.रू. दहा लाख फक्त) पर्यंत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २५२८ विषय क्रमांक - ८
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – ह क्षेत्रिय कार्यालय,विद्युत
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.हक्षे/वि/जा/३३/२०१८ दि.२/४/२०१८
विषय- ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत माहे ऑगस्ट २०१७ पासुन मनपा मार्फत झालेल्या विविध कार्यक्रमांकरीता ध्वनीक्षेपन व्यवस्था करणे, तात्पुरती प्रकाश व्यवस्था करणे व जनरेटर द्वारे वीजपुरवठा करणे काम मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर एन्ड इलेक्ट्रीकल्स, निगडी, पुणे-४४ यांचेकडून करुन घेतलेने सदर कामाचा खर्च र.रु.९,५८,६६४/- अदा करणेस मान्यता देणेबाबत...

विषय क्रमांक ८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५२९ विषय क्रमांक - ९
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – ड क्षेत्रिय कार्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.डक्षे/८/कावि/१८१/२०१८ दि.३१/३/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

ड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील कचरा उचलणे व वाहतुक करणेकामी दि.१५/१०/२०१६ रोजी करणेत आलेला सिलबंद मुळ करारनाम्यातील अटी शर्ती कायम ठेवून दि.०१/०४/२०१८ ते दि.३०/६/२०१८ अखेर अथवा निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी यापैकी प्रथम येणा-या कालावधी पर्यंत मे. जयगणेश एंटरप्रायजेस, पिंपरीगांव यांनी भोसरी कचरा स्थानांतर केंद्रासाठी प्रतिदिन प्रतिवाहन दोन खेपांसाठी ४ मजुर १ वाहनचालकांसह र.रु.४,२५०/- व मोशी कचरा डोपोसाठी प्रतिदिन प्रतिवाहन दोन खेपांसाठी ४ मजुर १ वाहनचालकांसह र.रु.४,४५०/- या दराने एकुण १२ टिपर/ट्रक वाहने पुरविणेस मान्यता देणेत येत आहे व याकामी अंदाजीत अपेक्षीत खर्च र.रु.४९,६६,२००/-(अक्षरी र.रू.एकोणपन्नास लाख सहासष्ट हजार दोनशे फक्त) या येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५३०	विषय क्रमांक - १०
दिनांक – ११/०४/२०१८	विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.नम्रता लोंढे	अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/मुख्य/४७/२०१८ दि.३/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शेवाळेवाडी ग्रामपंचायत तर्फे सरपंच व इतर अर्जदार विरूध्द पिंपरी चिंचवड महानगरपालिका या अर्ज नं.३७/२०१६ प्रकरणी राष्ट्रीय हरीत लवाद, पश्चिम विभाग, पुणे यांचे समोर दि.१६/१२/२०१६ रोजी सुनावणी झाली. त्यावेळेस मा. राष्ट्रीय हरीत लवादाने, शेवाळेवाडी ग्रामपंचायतीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने १०,००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या दैनंदिन १० टॅकर ट्रिप्स पुढील आदेश होईपर्यंत पुरविणेकामी आदेश दिले आहेत. या बाबतची कार्यवाही त्वरीत करणेची आहे. शेवाळेवाडी हे गाव पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर असलेने हद्दीबाहेरील कामासाठी तसेच त्याकामापोटी येणा-या खर्चासाठी मा.स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक आहे. सदरबाबत कालावधी निश्चित नसल्याने तुर्तास सहा महिने कालावधी गृहीत धरून तसेच तातडीने कार्यवाही करणेची असलेने जलक्षेत्र क्र.ड/१३ दापोडी परिसरात टॅंकरव्दारे पाणीपुरवठा करणे या कामातून सदर काम करून घेणे आवश्यक आहे. तसेच सदर कामास रक्कम रू.४०,००,०००/- ची सुधारीत प्रशासकीय मान्यता मा.महापालिका सभा दि.०५/०२/२०१८, ठराव क्र.१३५ नुसार मान्यता मिळाली आहे. तरी महापालिका सभा दि.०५/०२/२०१८, ठराव क्र.१३५ नुसार मंजूरी मिळालेल्या उपरोक्त प्रशासकीय मान्यतेस अनुसरून जलक्षेत्र क्र.ड/१३ दापोडी परिसरात टॅंकरव्दारे पाणीपुरवठा करणे याकामातून विषयांकीत कामासाठी येणा-या खर्च रक्कम रू.४०,००,०००/- (अक्षरी र.रू.चाळीस लाख फक्त) ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५३१	विषय क्रमांक - ११
दिनांक – ११/०४/२०१८	विभाग – नगरसचिव
सूचक – मा.नम्रता लोंढे	अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ– मा.नगरसचिव यांचे जावक क्र.नस/५/कावि/२८६/२०१८ दि.४/४/२०१८

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५३२ विषय क्रमांक - १२

दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/११/कावि/३४१/२०१८ दि.३/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

निविदा सूचना क्रमांक १८/२०१७-१८ नुसार लघुत्तम निविदा धारक मे. मोनार्च टेक्नोलॉजीज (पुणे) प्रा. लि. यांना पुढील एक वर्षा करीता पिंपरी चिंचवड मनपाचे सर्व्हर, फायरवॉल व आवश्यक संगणक यंत्रणा देखभाल दुरुस्ती करणे कामकाज देण्यास तसेच त्यांचेसोबत कामाचा करारनामा करण्यास व त्यासाठी येणा-या र.रू.४८,५१,०००/- (अक्षरी र.रू.अठ्ठेचाळीस लाख एकावन्न हजार फक्त) (सर्व करांसाहीत) अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३९.०७% ने कमी चे दरास व त्या अनुषंगाने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५३३ विषय क्रमांक - १३

दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/८/कावि/१३५/२०१८ दि.३१/३/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

Software Technology Parks of India, हिंजवडी, पुणे येथे म.न.पा.चे Primary Data Centre दि.४/०४/२०१८ पासुन पुढील एक महिने कालावधीसाठी पूर्वीचे करारनाम्यातील अटीशर्ती नुसार कार्यान्वित ठेवण्याकामी येणा-या र.रु.१,९१,३३३/-(अक्षरी र.रू.एक लाख एक्याण्णव हजार तीनशे तेहतीस फक्त) अधिक टॅक्स इतक्या खर्चास व पुढील एक महिना मुदतवाढीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५३४ विषय क्रमांक - १४

दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक–मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/पापु/११५/२०१८ दि.४/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहराच्या ४० टक्के भागाला २४X७ पाणीपुरवठा करणेच्या योजनेअंतर्गत मौजे मोशी, खान्देशनगर येथे पाण्याची पाईप लाईन टाकण्याचे काम ठेकेदारामार्फत करण्यात येत आहे. सदर लाईन टाकताना एचपीसीएलची पेट्रोल लाईन मध्ये आलेली आहे. सदर पेट्रोल लाईन Cross करण्यासाठी परवानगी मिळण्याबाबत एचपीसीएलकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

एचपीसीएलच्या अधिका-यांनी समक्ष जागेवर येऊन पाहणी केलेली आहे. तसेच सदर पेट्रोल लाईन क्रॉसिंग करण्याकामी र.रु.18,000/- इतके शुल्क भरण्याबाबत कळविलेले होते. सदरची रक्कम एचपीसीएलकडे जमा करण्यात आलेली आहे. तदनंतर एचपीसीएलने सदर ठिकाणी पाण्याची लाईन क्रॉसिंग करताना पेट्रोल लाईनचा र.रु.2.50 कोटी इतक्या रक्कमेचा विमा काढण्याबाबत मेलद्वारे कळविले आहे. त्यासाठी विविध इन्शुरन्स कंपन्यांकडून दर मागविले असता दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी लि. यांनी र.रु.94,548/- नॅशनल इन्शुरन्स कंपनी यांनी र.रू.59,444/- व युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. यांनी र.रु.58,007/- इतका प्रिमियम कळविला आहे. सदर ठिकाणी टाकण्यासाठी पेट्रोल लाईन क्रॉस करणे आवश्यक असल्याने सदर प्रिमीयमची रक्कम भरणे गरजेचे आहे. सदरच्या खर्चास मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. तथापि सदरचे काम तातडीचे असल्याने र.रु.58,007/- (अक्षरी र.रु.अठ्ठावण्ण हजार सात फक्त) इतकी रक्कम प्रिमियम पोटी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. यांना अदा करण्यात आलेली आहे. तरी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. यांना प्रिमियम पोटी अदा केलेल्या र.रु.58,007/- इतक्या रक्कमेच्या मान्यतेकामी विषय अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५३५ — विषय क्रमांक - १५

दिनांक – ११/०४/२०१८ — विभाग – लेखा

सूचक –मा.विलास मडिगेरी — अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/४२४६/२०१८ दि.५/४/२०१८

विषय - पीएमपीएमएल संचलनतूट व विविध प्रकारचे सवलतीचे पासेसपोटी दरमहा रक्कम अदा करावयाचे रक्कमेस मान्यता देणेबाबत...

विषय क्रमांक १५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५३६ — विषय क्रमांक - १६

दिनांक – ११/०४/२०१८ — विभाग – स्थापत्य EWS प्रकल्प

सूचक – मा.साधना मळेकर — अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/EWSप्र/१९६/२०१८ दि.५/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मौजे च-होली येथील नविन स.नं.४०८ पै, ४०९ पै (आरक्षण क्र.२/८३) येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) घरकुल योजना राबविणेचे काम चालू आहे. सदर प्रकल्पाकरिता Environmental Clearance घेणे आवश्यक आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.२४३७, दि.२१/०३/२०१८ अन्वये PMAY प्रकल्पासाठी पर्यावरण सल्लागार म्हणून मे.ग्रीन सर्कल इं. यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पाचे Environmental Clearance पर्यावरण सल्लागार मे.ग्रीन सर्कल इं. यांनी पर्यावरण विभागाकडे ऑनलाईन अर्ज सादर केला आहे. पर्यावरण सल्लागार यांनी दि.०३/०४/२०१८ रोजीचे ई-मेल द्वारे कळविलेप्रमाणे Environmental Clearance Scrutiny करिता र.रु.५,००,०००/- फी पर्यावरण विभागाकडे RTGS/NEFT द्वारे भरणेचे आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

**Bank Details for RTGS/NEFT**

Account Name: **SEIAA/SEAC SECRETARIAT**
Bank Name: **State Bank of India**
Bank Account No: **33876812558**
Bank Account Type: **Current Account**
Bank Address: **76-A, Rafi Ahmed Kidwai Rd, Gujarati Kelwani Mandal School, Matunga Br.Mumbai- 400 015.**
IFSC Code: **SBIN0005350**
MICR Code: **400002056**
Email: **cao@mpcb.gov.in / account@mpcb.gov.in**

तरी प्रकल्प सल्लागार यांनी कळविलेनुसार सदर प्रकल्पास Environmental Clearance मिळणेकामी र.रु.५,००,०००/- (अक्षरी र.रू. पाच लाख फक्त) इतकी फी RTGS/NEFT द्वारे SEIAA/SEAC SECRETARIAT यांचेकडे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५३७ विषय क्रमांक - १७
दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – उद्यान
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/२/कावि/१६२/२०१८ दि.२६/३/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.५/२०१७-१८ अन्वये मनपाच्या उद्यान विभागास प्रभाग क्र.19 मधील श्रीधरनगर उद्यानामध्ये ओपन जीम साहित्य पुरविणे व बसविणेकामी मे. काळेश्वरी स्पोर्टस् या ठेकेदाराची निविदा रक्कम रू.**14,72,060/- (**अक्षरी र.रू.चौदा लाख बाहत्तर हजार साठ फक्त) पेक्षा 44 टक्के कमी दराची निविदा मंजुर दराने येणारा खर्च रक्कम रुपये 8,24,354/- प्रमाणे काम करुन घेणेस तसेच निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५३८ विषय क्रमांक - १८

दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नाविंयो/२/कावि/२२२/२०१८ दि.६/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिला व बाल-कल्याण समितीच्या सन्मा.नगरसेविका यांचेसाठी केरळ येथे दि.८.४.२०१८ ते दि.१३.४.२०१८ या कालावधीत अभ्यास/प्रशिक्षण दौरा आयोजित करणेबाबत त्यांचेकडिल दिनांक ३/४/२०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर दौ-याचें आयोजनाकामी आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी दि.४/४/२०१८ च्या पत्रान्वये प्रति व्यक्ती रेल्वे (Two Tire A/C) प्रवासासह रक्कम रु.५६,३१०/- इतका नमूद केला असून सदर दौ-यासाठी ५ नगरसदस्या व आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुणे यांचेकडील १ समन्वयक या दौ-यामध्ये त्याच्या समवेत जाणार आहेत. सबब महिला व बाल कल्याण समिती सदस्यांच्या केरळ अभ्यास दौ-याचे थेट पध्दतीने आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांनी नियोजन करणे व याकामी एकूण ६ व्यक्तीचे दौ-यासाठी र.रू.३,३७,८६०/- (अक्षरी र.रू. तीन लाख सदोतीस हजार आठशे साठ फक्त) इतका खर्च अपेक्षित असल्याने सदर खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५३९ विषय क्रमांक - १९

दिनांक – ११/०४/२०१८ विभाग – माहिती व जनसंपर्क

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/४/कावि/१४३/२०१८ दि.७/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याचा प्रचार आणि प्रसार उपक्रमांतर्गत प्रबोधनपर्वाचे आयोजन दि.११/४/२०१८ ते दि.१४/४/२०१८ पर्यंत एकूण ४ दिवस करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने याकामी मान्यवर, कार्यक्रमाचे मानधन, कलाकारांचे मानधन, पत्रकार, कलाकार, पदाधिकारी चहापान, भोजन, आतषबाजी, जाहिरात खर्च इ. कामी थेट पध्दतीने येणारा खर्च र.रु.२२,९३,५००/- तसेच या व्यतिरिक्त प्रबोधणात्मक पुस्तके, फ्लेक्स, बॅनर, होर्डींग, एल.ई.डी. स्क्रिन, सॅन्ड आर्ट, स्मृतीचिन्ह, कार्यक्रमाचे व्हिडीओ शुटींग इ. साठी र.रु.२,०५,०००/- असा एकूण र.रु.२४,९८,५००/-(अक्षरी र.रु.चोवीस लाख अठ्ठयाण्णव हजार पाचशे फक्त) अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक -२५४० विषय क्रमांक - २०

दिनांक – ११/०४/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ– मा.सागर आंगोळकर, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक २१८१ दिनांक ०७/०२/२०१८ मधील महापालिकेच्या उप अभियंता (स्थापत्य/विद्युत) यांचे फिरतीचे कामकाज विचारात घेता तसेच उपअभियंता हे वर्ग २ अधिकारी असल्याने त्यांना सुद्धा वरील प्रमाणे वाहन प्रतिपुर्ती रक्कम रु.३३,३७३/- (पेट्रोल वाहनाकरीता) र.रु.३०,८७६/- (डिझेल वाहनाकरिता) दरमहा देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पाणीपुरवठा विभागातील उपअभियंता यांचे फिरतीचे कामकाज विचारात घेऊन त्यांना सुद्धा वरील प्रमाणे वाहन प्रतिपुर्ती (पेट्रोल/डिझेल वाहनाकरिता) देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५४१ विषय क्रमांक - २१

दिनांक – ११/०४/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ– मा.सागर आंगोळकर, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विक्रम पल्ले अकादमी, खडकी, पुणे यांचे सहकार्याने दि.१५/४/२०१८ ते १४/५/२०१८ या काळात मेजर ध्यानंचंद हॉकी पॉलीग्रास स्टेडीयम नेहरुनगर येथे २५० विद्यार्थी खेळाडूंसाठी, उन्हाळी हॉकी प्रशिक्षण शिबीर २०१८ चे आयोजन करण्यात येत आहे. सदर उन्हाळी हॉकी प्रशिक्षण शिबीर २०१८ आयोजनाकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | खर्चाचा तपशील | अंदाजे खर्च र.रु. |
|---|---|---|
| १ | हॉकी स्टिक =५० X रु.१८००/- = ९०,०००/- | ९०,०००/- |
| २ | हॉकी बॉल्स २०० नग X रु.१८००/- = ४०,०००/- | ४०,०००/- |
| ३ | कोन्स = ५० नग | आहेत |
| ४ | डोम्स - ५० नग X रु.१००/- = ५०००/- | ५,०००/- |
| ५ | सेट बिप्स = ४ नग | आहेत |
| ६ | फिटनेस हर्डल्स = १२ नग | आहेत |
| ७ | सकस आहार (डायट) फळे दुध अंडी पाणी = क्रीडा प्रबोधिनी विद्यार्थी करिता पुरविण्यात येणारे अल्पोपहार दरानुसार रु.३५.३५ X २५० विद्यार्थी + १० कोच मार्गदर्शक = २६० X रु.३५.३५ = ९१९१ X ३० दिवस | २,७५,७३०/- |

| | | |
|---|---|---|
| | = २,७५,७३०/- | |
| ८ | प्रशिक्षकांसाठी टी शर्टस १० नग X रु.५००/- = ५०००/-<br>टोपी १० नग X रु.१५०/- = १५००/- | ६,५००/- |
| ९ | खेळाडूंसाठी टी शर्टस २५० नग X रु.५००/- = १,२५,०००/-<br>सहभाग प्रमाणपत्र २५० नग X रु.१५/- = ३७५०/- | १,२८,७५०/- |
| १० | प्रशिक्षक मानधन, विक्रम पिल्ले रु.१५००/- X ३० दिवस = ४५,०००/-<br>सहाय्यक चार प्रशिक्षक रु.५०००/- X ४ X ३० दिवस =६०,०००/- | १,०५,०००/- |
| ११ | फ्लेक्स बॅनर, बुके खरेदी, पाहुणे चहापान खर्च | ३०२०/- |
| | एकूण खर्च र.रु. | ६,५४,०००/- |

तरी वरीलप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, विक्रम पिल्ले अकादमी, खडकी, पुणे यांचे सहकार्याने दि.१५/४/२०१८ ते १४/५/२०१८ या काळात मेजर ध्यानचंद हॉकी पॉलीग्रास स्टेडीयम नेहरुनगर येथे २५० विद्यार्थी खेळाडूंसाठी, उन्हाळी हॉकी प्रशिक्षण शिबीर २०१८ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.६,५४,०००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदरचा खर्च, क्रीडा निधी, क्रीडा प्रशिक्षण शिबीर, क्रीडा कला साहित्य खरेदी या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५४२ विषय क्रमांक - २२

दिनांक – ११/०४/२०१८

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.प्रज्ञा खानोलकर

संदर्भ– मा.विकास डोळस, मा.प्रज्ञा खानोलकर यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.११ मधील पूर्णानगर सेक्टर क्र.१८ येथील सी डी सी मधील मोकळी जागा क्र.४ पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेली आहे. सदर भागात सध्या उद्यानाची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे स्थानिक रहिवाशी व आसपासचे भागातील नागरीकांसाठी त्या भागात पर्यटन केंद्राचे धर्तीवर उद्यान विकसीत करणे अत्यावश्यक आहे. सदर उद्यान विकसीत केल्याने शहराचे सौंदर्यात भर पडेल. तसेच पर्यावरण संतुलन राखणेस मदत होईल. सदर उद्यान पर्यटन केंद्राचे धर्तीवर विकसीत करणेकरीता त्यामधील तज्ञ आर्किटेक्ट यांची नेमणूक करणे गरजेचे आहे. त्याकरीता महानगरपालिकेचे आर्किटेक्ट पॅनलवरील तज्ञ आर्किटेक्ट हार्दिक पांचाळ यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

तरी सदर कामाचे लॅंड स्केपिंग करणेकरीता आर्किटेक्ट हार्दिक पांचाळ यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेस व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मंजुर दराप्रमाणे प्रिटेंडर ॲक्टीव्हीटीसाठी ०.६०% व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटी करीता ०.४०% अशी एकूण १% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -२५४३ विषय क्रमांक - २३

दिनांक – ११/०४/२०१८

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.प्रज्ञा खानोलकर

संदर्भ– मा.विकास डोळस, मा.प्रज्ञा खानोलकर यांचा प्रस्ताव...

प्र.क्र.२६ वाकड-पिंपळे निलख मधील विविध डी.पी. रस्त्यांकरीता लिनिअर गार्डन व चौक सुशोभिकरण करणेकरीता मनपा पॅनेलवरील श्री.हार्दीक पांचाल (वास्तुविशारद) यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५४४ विषय क्रमांक - २४

दिनांक – ११/०४/२०१८

सूचक – मा.सारीका लांडगे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.सारीका लांडगे, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील स्थापत्य बीआरटीएस विभागामार्फत बीआरटीएस रस्ते विकसीत करणे व त्यावरील उड्डाणपूल, ग्रेडसेपरेटर, सबवे, फूटओव्हर ब्रीज बांधणे व गँट्री/कमानी उभारणेची कामे केली जातात. काळेवाडी फाटा ते देहु आळंदी पर्यंतचा ४५ मी. रुंदीच्या रस्त्याचे मजबुतीकरण व रुंदीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदर रस्त्यावर पवना नदी ते पुणे मुंबई लोहमार्ग व महामार्ग ओलांडुन ऑटोक्लस्टर बाजुकडे उतरणा-या उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात आहे. या उड्डाणपुलाखाली चिंचवड लिंकरोड बाजुकडील यशोपुरम, संत गार्डन व साई ग्रेस सोसायटी तसेच एम्पायर ईस्टेट व ऑटो क्लस्टर समोरील उड्डाणपुलाखाली स्थापत्य विषयक कामे करणे आवश्यक आहे. सदर कामासाटी प्रकल्प सल्लागार आवश्यक आहे. त्यासाठी आर्किटेक्ट मे.हार्दिक पांचाळ यांची नेमणूक करणेस व त्यांना मनपाच्या प्रचलित पद्धतीनुसार निविदा रक्कमेच्या २.३५% (निविदा पूर्व ०.९०% व निविदा पश्चात १.४५%) अधिक सेवाकर/जीएसटी अशी फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५४५ विषय क्रमांक - २५

दिनांक – ११/०४/२०१८

सूचक – मा.सारीका लांडगे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.सारीका लांडगे, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव...

चिंचवड येथील प्रभाग क्र.१९ मध्ये श्रीधर नगर उद्यानातील नुतनीकरण करणे व लहान मुलांसाठी फिजिकल ॲक्टीविटीसाठी ॲमॅझमेंट पार्क उभारणे या कामासाठी वास्तुविशारद म्हणून मनपा वास्तुविशारद पॅनलवरील मे.हार्दिक पांचाळ यांची वास्तुविशारद म्हणून नेमणूक करण्यास व त्यांना मनपाच्या नियमानुसार फी अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -२५४६ विषय क्रमांक - २६

दिनांक – ११/०४/२०१८

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक–मा.साधना मळेकर

संदर्भ– मा.यशोदा बोईनवाड, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.१९ मधील विविध चौक व लोकमान्य हॉस्पीटल येथील भुयारी मार्ग तसेच चिंचवड स्टेशन ते चाफेकर चौक या रोड वरील सुशोभिकरण या कामासाठी वास्तुविशारद म्हणून मनपा वास्तुविशारद पॅनलवरील मे.हार्दिक पांचाळ यांची वास्तुविशारद म्हणून नेमणूक करण्यास व त्यांना मनपाच्या नियमानुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५४७ विषय क्रमांक - २७

दिनांक – ११/०४/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक– मा.अर्चना बारणे

संदर्भ– मा.सागर आंगोळकर, मा.अर्चना बारणे यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव येथील आ.क्र.३४७ खेळाचे मैदान विकसीत करणे, प्रेक्षक गॅलरी व व्यापारी गाळे विकसीत करणे या कामाचे निविदा पश्चात करावयाची कामे आर्किटेक्चर नकाशे, मंजुरी व कामाचे सल्लागार म्हणून मे.आर्किटेक्चर हार्दिक पांचाळ यांची नेमणूक करण्यास व त्यांना मनपाचे नियमाप्रमाणे सर्वकरासह फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५४८ विषय क्रमांक - २८

दिनांक – ११/०४/२०१८

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक– मा.अर्चना बारणे

संदर्भ– मा.यशोदा बोईनवाड, मा.अर्चना बारणे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त र.रु.१०,०००/- अग्रीम रक्कम देण्याचे प्रशा/७/कावि/२६३/२०१८,दि.१०/०४/२०१८ अन्वये परिपत्रक पारित झालेले आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील घंटागाडी कर्मचारी यांनाही डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सणाकरीता र.रु.१०,०००/- अग्रीम देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५४९ विषय क्रमांक - २९

दिनांक – ११/०४/२०१८

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक– मा.अमित गावडे

संदर्भ– मा.साधना मळेकर, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव...

फ क्षेत्रिय कार्यक्षेत्रांतर्गत येणा-या प्रभाग क्र.१२ मधील तळवडे येथील बाह्य रुग्ण विभाग (ओ.पी.डी.) दवाखान्याच्या दि.१३/०४/२०१८ रोजी उदघाटन कार्यक्रमाकरीता जनित्र संच, ध्वनीक्षेपण व्यवस्था व प्रकाश व्यवस्था करणेकामी येणा-या र.रु.५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पन्नास हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५५० विषय क्रमांक - ३०

दिनांक – ११/०४/२०१८

सूचक – मा.विलास मडीगेरी अनुमोदक–मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.विलास मडीगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विविध प्रकारचे कार्यक्रम, उत्सव, क्रिडा स्पर्धा, क्रिडांगण, व्याख्याने, जयंती, पुण्यतिथी इ. वेळोवेळी आयोजित केले जातात. सदर कामासाठी स्थापत्य व विद्युत विभागाच्या माध्यमातून एल.ई.डी., स्पीकर व मंडप विषयक कामे निविदा काढून तसेच थेट पद्धतीने केली जातात. यावरील खर्चाचा आढावा घेतला असता अश्या प्रकारे मोठ्या प्रमाणात अनावश्यक खर्च होतो आहे असे निदर्शनास येते आहे. त्यामुळे या पुढे अश्या प्रकारचे अनावश्यक खर्च टाळणेकरीता यापुढे प्रबोधनावर व्याख्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने बांधलेल्या रामकृष्ण मोरे नाट्यगृह चिंचवड, अंकुशराव लांडगे नाट्यगृह भोसरी, निळू फुले नाट्यगृह सांगवी, आचार्य अत्रे नाट्यगृह वल्लभनगर, विविध सांस्कृतिक भवनामध्येच आयोजित करण्यास तसेच सर्व क्रीडास्पर्धा ह्या म.न.पा.च्या विविध क्रिडांगणातच घेण्यात याव्यात. याबाबत प्रशासनाने काळजी व दक्षता घेवून नियमानुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. असे केल्यामुळे एल.ई.डी., स्पीकर खर्च व मंडप खर्च कमी होवुन म.न.पा.ची आर्थिक बचत होणार असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५५१ विषय क्रमांक - ३१

दिनांक – ११/०४/२०१८

सूचक – मा.विलास मडीगेरी अनुमोदक–मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.विलास मडीगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.२२७८, दि.२१/०२/२०१८, विषय क्र.६६ तसेच ठराव क्र.२३८६, दि.२८/०२/२०१८ विषय क्र.९९ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व मोशी कचरा डेपो पर्यंत वाहतुक करणे या कामासाठी ८ वर्ष कालावधीसाठी नेमणुक करणे. दक्षिण विभाग निविदा क्र.१०/२०१७-१८ त्यामध्ये ए.जी.इनव्हायरो इन्फ्रा. प्रोजेक्ट प्रा.लि. यांचे दर इतर निविदाधारकांनी सादर केलेल्या दरापेक्षा लघुत्तम (L1) असल्याने त्यांना काम मंजूर केले होते. परंतु दि.१०/०४/२०१८ रोजी स.१०.३० वा. मा.आयुक्त यांनी कचरा संदर्भातील सादरीकरण दाखविण्यासाठी मनपातील सर्व पदाधिकारी, सर्व पक्षाचे गटनेते, संबंधित विभागाचे अधिकारी यांची मिटींग मा.आयुक्त कार्यालयात आयोजित केली होती. त्यासाठी सर्व पदाधिकारी व सर्व पक्षांचे गटनेते उपस्थित होते. सादरीकरण झालेनंतर चर्चा करण्यात आली. सर्व पदाधिकारी व सर्व गटनेते यांनी सदर कामासाठी २ निविदा काढणेपेक्षा ४ किंवा ८ निविदा प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयानुसार काढल्या तर सदर निविदा दर कमी येऊ शकतो. मा.आयुक्त यांचेबरोबर झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये यासाठी सदर वरील दोन्ही ठराव रद्द करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर निविदा महापालिकेच्या ८ क्षेत्रीय कार्यालयाप्रमाणे ८ फेरनिविदा लवकरात लवकर काढण्यास मान्यता देणेत येत आहे. नवीन निविदा काढून कार्यान्वित होईपर्यंत सध्याचे कामास योग्य मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच संबंधित ठेकेदारांकडुन काम व्यवस्थित चालू राहील याची काळजी व दक्षता प्रशासनाने घेवून सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२५५२ विषय क्रमांक - ३२

दिनांक – ११/०४/२०१८

सूचक – मा.विलास मडीगेरी अनुमोदक–मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.विलास मडीगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.२२७९, दि.२१/०२/२०१८, विषय क्र.६७ तसेच ठराव क्र.२३८५, दि.२८/०२/२०१८ विषय क्र.९८ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व मोशी कचरा डेपो पर्यंत वाहतुक करणे या कामासाठी ८ वर्ष कालावधीसाठी नेमणुक करणे. उत्तर विभाग निविदा क्र.११/२०१७-१८ त्यामध्ये बी.व्ही.जी.इंडिया लि. यांचे दर इतर निविदाधारकांनी सादर केलेल्या दरापेक्षा लघुत्तम (L1) असल्याने त्यांना काम मंजूर केले होते. परंतु दि.१०/०४/२०१८ रोजी स.१०.३० वा. मा.आयुक्त यांनी कचरा संदर्भातील सादरीकरण दाखविण्यासाठी मनपातील सर्व पदाधिकारी, सर्व पक्षाचे गटनेते, संबंधित विभागाचे अधिकारी

यांची मिटींग मा.आयुक्त कार्यालयात आयोजित केली होती. त्यासाठी सर्व पदाधिकारी व सर्व पक्षांचे गटनेते उपस्थित होते. सादरीकरण झालेनंतर चर्चा करण्यात आली. सर्व पदाधिकारी व सर्व गटनेते यांनी सदर कामासाठी २ निविदा काढणेपेक्षा ४ किंवा ८ निविदा प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयानुसार काढल्या तर सदर निविदा दर कमी येऊ शकतो. मा.आयुक्त यांचेबरोबर झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये यासाठी सदर वरील दोन्ही ठराव रद्द करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर निविदा महापालिकेच्या ८ क्षेत्रीय कार्यालयाप्रमाणे ८ फेरनिविदा लवकरात लवकर काढण्यास मान्यता देणेत येत आहे. नवीन निविदा काढून कार्यान्वित होईपर्यंत सध्याचे कामास योग्य मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच संबंधित ठेकेदारांकडुन काम व्यवस्थित चालू राहील याची काळजी व दक्षता प्रशासनाने घेवून सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/७/कावि/१५६/२०१८
दिनांक - ११/०४/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.हक्षे/वि/जा/३३/२०१८ दि.०२/०४/२०१८ विषय क्र.८ चे लगत)

PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION,
PIMPRI - 411018.

**Name of work :-- Providing Temporary P.A system & illumination for Various programme in `H` zone areas**

| | | | | | items | metal halide | halogen | Scaffolding | Series Light | generator 3to10kva | pa system VVIP | pa system | pa system vip | LED screen |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| sr no | Name of work | Place of work | Date | days | rates | 194 | 177 | 6000 | 943 | 4293 | 23000 | 2500 | 7500 | 250 |
| 1 | Indepence Day | H Zone | 15-08-17 | 1 | | | | | 2 | | | | 1 | |
| 2 | Tanaji Malusare Vardhapan Din | Dapodi | 19-08-17 | 1 | | 2 | 2 | | 2 | 1 | | | 1 | |
| 3 | Ahilyabai Holkar Punyatithi | Sanghavi | 20-08-17 | 1 | | | | | | 1 | | | 1 | |
| 4 | Hand ball | H.A school pimpri | 26/08/2017 to 31/08/2017 | 6 | | | | | | 5.5 | | | 6 | |
| 5 | Talvarbaji | Kasarwadi prathimik school | 28/08/2017 to 29/08/2017 | 2 | | | | | | 1.9 | | | 2 | |
| 6 | Nehru cup hockey | Polygrass hockey stadium | 29/08/2017 to 31/08/2017 | 3 | | | | | | 2.8 | | | 3 | |
| 7 | Shalaya hockey | Polygrass hockey stadium | 01/09/2017 to 06/09/2017 | 6 | | | | | | 5.5 | | | 6 | |
| 8 | Ganesh Festival Meeting | Acharya atre | 02-09-17 | 1 | | | | | | | 1 | | | 192 |
| 9 | H Zone Meeting | H Zone Meeting | 07-09-17 | 1 | | | | | | | | | 1 | |
| 10 | Engineering Day | Magar Stadium | 13/09 to 14/09/2017 | 2 | | | | | | | 2 | | | |
| 11 | Yogasan | Din Dayal Madhamik Vidhyalaya | 16/09/2017 to 17/09/2017 | 2 | | | | | | 1.9 | | | 2 | |
| 12 | Engineering Day | Phule auditorium pimple gurav | 15-09-17 | 1 | | | 10 | | | | | | | 448 |
| 13 | Soft ball | Dr Babasaheb Ambedkar Krida sankul sant tukaram nagar | 22/09/2017 to 25/09/2017 | 4 | | | | | | 3.7 | | | 4 | |
| 14 | Kabaddi | Kasarwadi prathimik school | 22/09/2017 to 29/09/2017 | 8 | | | | | | 7.3 | | | 8 | |
| 15 | Swach Bharat Abhiyan | H Zone | 25/09/2017 to 30/09/2017 | 6 | | | | | | | | 6 | | |

(e)

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | Baseball | Dr Babasaheb Ambedkar Krida sankul sant tukaram nagar | 26/09/2017 to 29/09/2017 | 4 | | | | | | 3.7 | | | 4 | |
| 17 | Bhagat singh | Dapodi | 28-09-17 | 1 | | | | | | 1 | | | 1 | |
| 18 | H Zone Meeting | H Zone meeting | 05-10-17 | 1 | | | | | | | | | 1 | |
| 19 | Valmiki Jayanti | YCMH | 05-10-17 | 1 | | | | | | | | | 1 | |
| 20 | Phule auditorium mohastav | Phule auditorium pimple gurav | 13/10 to 15/10/2017 | 3 | | | | | | | | | | 720 |
| 21 | Chhat pooja | Bombay colony | 25/10/2017 to 27/10/2017 | 3 | | 3 | 4 | | | | | | | |
| 22 | Chhat pooja | kasarwadi ghat | 25/10/2017 to 27/10/2017 | 3 | | | 4 | | | | | | | |
| 23 | YCMH Doctor recruitment Interview | YCMH | 6/11 & 7/11/2017 | 2 | | | | | | | 2 | | | |
| 24 | Vasant dada Patil Jayanti | Sanghavi Bus stop | 13-11-17 | 1 | | | | | | 1 | | | 1 | |
| 25 | Yeshwant Chavan Jayanti | Vallabhnagar st stand | 25-11-17 | 1 | | | | | | 1 | | | 1 | |
| 26 | Yeshwant Chavan Jayanti | YCMH | 25-11-17 | 1 | | | | | | | | | 1 | |
| 27 | Bhai Kotwal Jayanti | Phugewadi | 01-12-17 | 1 | | | | | | | | | 1 | |
| 28 | Parinirvan Din | Dapodi ambedkar statue | 06-12-17 | 1 | | | | | | 1 | | | 1 | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | Total Qty | | | 5 | 20 | 0 | 4 | 38.3 | 5 | 6 | 47 | 1360 |

Junior Engg ( Elec )
H Ward PCMC

Deputy Engg ( Elec )
H Ward PCMC

Executive Engg ( Elec )
H Ward PCMC